-=: प्रकरण दुसरे :=-

## संबंधित साहित्याचा व संशोधनाचा अभ्यास

२.१ प्रस्तावना

२.२ [अ] संबंधित साहित्य ग्रंथांचा अभ्यास

[आ] संबंधित संशोधनाचा अभ्यास

२.३ समारोप

संदर्भ ...

*-*-*

# प्रकरण दुसरे

## संबंधित साहित्याचा व संशोधनाचा अभ्यास

### २.१ प्रस्तावना :-

संबंधित साहित्याचा अभ्यास केल्यामुळे आपण जे संशोधन करणार आहोत ते संशोधन पूर्वी झाले आहे काय ते समजते, म्हणून झाले असल्यास त्याची पुनरावृत्ती टाळता येते. जुन्यातील पुनरावृत्ती केंव्हाच मान्य केली जात नाही.-१ संशोधकाला या संबंधित संशोधनातून संशोधनाची दिशा, कार्यपध्दती या विषयी मार्गदर्शन होते.

पूर्व संशोधनाच्या अभ्यासाच्यावेळी जुन्या संशोधकाने प्रतिसादकांची निवड करतांना काय काळजी घेतली व कोणते धोरण अंगीकारले याचा अभ्यास उपयुक्त ठरतो.

संशोधनाची योजना आखताना आणि संशोधनात जमविलेल्या माहितीचा अर्थ लावतांना आणि निष्कर्ष किंवा अनुमान सांगताना संशोधकाच्या अनुभवाचा, ज्ञानाचा लाभ घेता आला पाहिजे आणि यासाठी संशोधकाने इतर अधिकारी व्यक्तींच्या पुस्तकांच्या अभ्यासातून काढलेली टिपणे व पूर्व संशोधनातून घेतलेले मार्गदर्शन यांच्यासारखीच स्वानुभवाची नोंद करणे आवश्यक ठरते.

पथदर्शक अभ्यासाची जरूरी काय व त्यासाठी प्रतिसादकांचा नमुना लहान असला तरी चालेल का हे पाहणे आवश्यक असते कारण मुख्य प्रश्नाची

सोडवणूक करण्यासाठी केवळ अंधारात उडी घेण्यापेक्षा मार्गदर्शक अभ्यासातून मिळणाऱ्या प्राथमिक स्वरूपाचा एक अगर अनेक उपायांचा विचार करण्यास सुरुवात करणे इष्ट असते. त्यामुळे मार्गदर्शक अभ्यासासाठी वापरण्यांत आलेल्या साधनात संशोधकास अनुभवाने सुधारणा करता येतात.

संदर्भ सर्वेक्षणामुळे संशोधकास आपल्या विषयातील नाविन्य काय आहे ते मांडता येते. पूर्वीच्या संशोधनाचा उपयोग पायाभूत मानता येतो. संशोधनाचा दर्जा वाढविता येतो. वेळ, श्रम व पैसा यांचा योग्य-तऱ्हेने व्यय करता येतो.

संदर्भ ग्रंथ, ज्ञानकोष, शब्दकोष, हस्तपुस्तके व वार्षिके, निर्देष-सूची, गोषवारा व नियतकालिके, शैक्षणिक संशोधन, अप्रकाशित साहित्य, संशोधन प्रतिवृत्ते या सर्वांमुळे उपयुक्त माहिती व कौशल्य प्राप्त होते.

२.२ संबंधित साहित्य ग्रंथांचा अभ्यास :-

अ] या संशोधनासाठी खालील संदर्भ ग्रंथांचा अभ्यास केला.


१] BEST JOHN W. : Research in Education, New Delhi, Prentice Hall 1983.

२] BUCH M.B. : A Survey of Research in Education, Baroda, Center of Advanced Studies in Education, 1974

३] KOTHARI C. R. : Research Methodology, New Delhi, Wiley Eastern, 1985.

४] SINGH S. K. : Methodology and Research in Education, New Delhi, Sterling Publications, 1985

५] DIRECTORATE GOVERNMENT : Maharashtra Employees of Private Schools Rules, 1981 Pune Bombay, Printed in India by The Manager, Government Photo Zinco Press, Pune & Published by the Director Government Printing and Stationary Maharashtra State.

६] DIRECTORATE GOVERNMENT : The Maharashtra S.S.C. Exam. regulations, Pune, The Secretary S.S.C. Board, 1963

७] डॉ. भा. गो. बापट : शैक्षणिक संशोधन, पुणे, नूतन प्रकाशन, १९७५

८] डॉ. पु. ल. भांडारकर : सामाजिक संशोधन पद्धती नागपूर, म. वि. ग्रं. नि. मंडळ, १९८७

९] रतनलाल भंडारी : नवा शैक्षणिक कायदा मार्गदर्शिका कोल्हापूर, अजब पुस्तकालय, १९८२.

१०] र. वि. शिंदीड : शिक्षक-शिक्षकेतर मार्गदर्शक,
[ न्यायाधिकरण व निवाडे ]
पुणे, श्री. अंबिका प्रकाशन, १९८९

११] र. वि. शिंदीड : माध्यमिक शाळा, वेतन सेवा, प्रशासन
मार्गदर्शक [ भाग पहिला ]
पुणे, श्री. अंबिका प्रकाशन .

१२] बोरगावकर, ठाकूर : माध्यमिक शिक्षक वेतन सेवा मार्गदर्शक
सोनवणे, साठे [संकलन ] मुंबई, भारतीय शिक्षण मंडळ,
१९७५ .

१३] श. श. मुळे, : शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे,
वि. तु. उमाटे नागपूर, साहित्य प्रसार केंद्र प्रकाशन,
१९७७ .

१४] संपादक, आवृत्ती : अनुदानपात्र बाबी, [हस्तपुस्तिका ]
सुरवसे स. शं. कोल्हापूर, को. जि. मा. शा. व उच्च
मा. शा. मुख्याध्यापक संघ, १७ १०. ९१

१५] संपादक, आवृत्ती : भारतीय शिक्षण, [ मासिक ]
कामत यशोधा मुंबई, भारतीय शिक्षण मंडळ प्रकाशन,
मार्च- १९९५.

१६] संपादक, आवृत्ती : महाराष्ट्र एज्युकेशनल जर्नल [ मासिक ]
पीरजादे एम. एम. सातारा, भवानी विद्यामंदिर,
सप्टेंबर - १९९४

१७] संपादक, आवृत्ती : महाराष्ट्र एज्युकेशनल जर्नल [मासिक]
कुलकर्णी क. कृ. सोलापूर, वांडक प्रशाला,
डिसेंबर - १९९१ .

१८] संपादक, आवृत्ती : मुख्याध्यापकांचे उद्बोधन शिबीर
शिक्षण संचालक [हस्तपुस्तिका ], मुंबई,
महाराष्ट्र राज्य, शैक्षणिक संशोधन
व प्रशिक्षण परिषद,

आ ] संबंधित संशोधनाचा अभ्यास -

पूर्वी झालेल्या कार्याचा शोध घेण्या-करिता दीर्घ प्रयत्न करावे लागत असले तरी त्यामुळे संशोधनाचे कार्य पध्दतशीर व सुफल होण्यास मदत होत असते.

" The Student should find, analyse and evaluate critically every pertinent research report dealing with his chosen problem. Anything less than this will be neither sensible nor scientific." 2

म्हणून प्रत्येक संबंधित संशोधनाचा अभ्यास बारकाईने करणे आवश्यक असते.

संशोधकाने खालील संबंधीत संशोधनाचा अभ्यास केला.

१] Das M. : A study of the Administrative behaviour of Secondary School Principals in relation to selected School Variables, Ph.D, Education, M.S.U., 1983 3

काही निवडक शालेय चलाच्या संबंधाने माध्यमिक शाळांच्या प्राचार्यांच्या प्रशासकीय वर्तनाचा अभ्यास करणे. .. .. .. ३

उद्दिष्टे –

१. शिक्षकांचा काम करण्याकडील कल, शालेय कार्याची घडी, शालेय वातावरण, विद्यार्थ्यांची प्रगती या घटकांचा माध्यमिक शाळांच्या प्रशासकीय वर्तनावर वारंवारिता व परिणामकारक दर्जाच्या अनुषंगाने अभ्यास करणे.

२. शिक्षकांचा काम करण्याचा कल, संस्थेची एकंदर कार्याची घडी आणि विद्यार्थ्यांची ग्रहणक्षमता यामधील परस्परसंबंधांचा अभ्यास करणे.

कार्यपध्दती –

गुजरात राज्यातील माध्यमिक शाळांतील २६ प्राचार्य, २६० शिक्षक, व २६ इंग्रजी माध्यमाच्या ९ वी च्या वर्गातील १०२० विद्यार्थ्यांना नमुना निवड म्हणून अभ्यासासाठी घेतले होते.

तसेच केंद्र सरकारच्या अधिपत्याखालील दमण, गोवा मधील प्रदेशाचाही विचार केला.

जॉर्जिया [ १९७३-७७ ] विद्यापिठाने विकसित केलेल्या प्राचार्यांच्या वर्णनात्मक सर्वेक्षणातील प्रतिसादाचा साधन म्हणून अभ्यासासाठी उपयोग केला.

स्लेट व मास्टर्स [ १९७७ ] यांनी सुधारित केलेल्या शिक्षक अभिवृत्ती कसोटी आणि १९७४ च्या जॉर्जिया विद्यापीठाच्या "माझ्या शालेय वातावरण मूल्यमापनाची शोधिका" वापरली.

विस्तृत सांख्यिकी तंत्रे, पीअर्सन्स प्रॉडक्ट मोमेंट कोरिलेशन टी-टेस्ट, रॅन्क डिफरन्स कोरिलेशन आणि व्हीटने यूटेस्ट यांचा उपयोग केला.

<u>निष्कर्ष</u> -

१. माध्यमिक शाळांचे प्राचार्य शैक्षणिक प्रशासकीय आव्हानाच्या बाबतीत सर्वसाधारणपणे परिणामकारक आढळले.

२. प्राचार्यांचे प्रशासकीय वर्तन, शिक्षकांचा कामे करण्याचा कल आणि संस्थेच्या कार्याची घडी या सर्वांमध्ये धनसहसंबंध आढळला.

३. शाळेचे वातावरण आणि प्राचार्यांचे प्रशासकीय वर्तन यामध्ये मात्र कोणताही लक्षणीय सहसंबंध आढळून आला नाही.

४. विद्यार्थ्यांची ग्रहणक्षमता आणि प्राचार्यांचे प्रशासकीय वर्तन यामध्ये कोणताही लक्षणीय सहसंबंध आढळला नाही.

५. कार्यभार, विद्यार्थी मूल्यमापन सराव, सहका-यांशी संबंध, प्रशासकीय योजना यापेक्षा शिक्षकांचा कल मात्र तुलनात्मकदृष्टया जास्तीत जास्त पर्यवेक्षण संबंधाकडेच आढळला.

६. विद्यार्थ्यांची ग्रहणक्षमता, संस्थेच्या कार्याची घडी व शिक्षकांचा काम करण्याकडील कल या दरम्यान कोणताही लक्षणीय संबंध आढळला नाही.

७. विद्यार्थ्यांची ग्रहणक्षमता आणि शालेय वातावरण यांच्याही दरम्यान कोणताही लक्षणीय सहसंबंध आढळला नाही.

८. माध्यमिक शाळांच्या प्राचार्यांचा शिक्षकांच्या बाबतीत त्यांचा कामाचा कल व दृष्टीकोन अधिक सुयोग्य व संस्थेच्या कामाची घडी व्यवस्थित ठेवणे व प्रशासकीय प्रश्न हाताळण्यातील त्यांचा सहभाग पुरेसा व परिणामकारक आढळला.

९. विविध शैक्षणिक प्रशासकीय प्रश्न सोडविण्यासाठी व अधिक कृतिशील होण्यासाठी शाळांच्या प्राचार्यांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमाच्या विविध सोयी उपलब्ध होत्या.

२] EZEKEIL, N. : Teacher participation in School administration in Greater Bombay, Ph.D., Education, Bombay University 1966.

बृहन्मुंबईमधील शिक्षकांचा शालेय प्रशासनातील सहभाग. .. .. .. ४

<u>उद्दिष्टे</u> =

१. शिक्षकांकडून शैक्षणिक प्रशासनामध्ये येणाऱ्या स्थितीमध्ये व विस्तृतपणे प्रासंगिक कालावधीच्यावेळी प्रशासनात अधिकाधिक सहभाग घेता येणे यांचा शोध घेणे.

२. तात्त्विक-दृष्टीने व व्यावहारिकदृष्टीने भाग घेताना प्रशासनामधील अध्यापनाचा एक भाग म्हणून असणाऱ्या तत्वज्ञानाचा अभ्यास करणे.

<u>कार्यपद्धती</u> -

कमीतकमी ५ वर्षे अनुभव असणाऱ्या ७२० शिक्षकांचा सदर अभ्यासासाठी नमुना म्हणून आणि कमीत कमी १ वर्ष अनुभव

असणाऱ्या १२० निवडक शाळांमधील ३०४ प्रशासकांचाही अभ्यास केला. या कामासाठी प्रश्नावली तयार करून उपरोक्त उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वापरली.

निष्कर्ष -

१. प्रशासनाच्या सर्व पातळ्या शिक्षकांना भाग घेण्यासाठी नव्हत्या.

२. सध्याच्या शाळांच्या प्रशासनाचा नेमका आढावा घेतला तर लोकशाहीवादी शालेय प्रशासन पुढील गोष्टींशी संबंधित आहे.

अ] लोकशाहीवादी कल.

आ] लोकशाही अनुभूतीतून कौशल्ये शिकणे.

इ] लोकशाहीमुळे प्रत्येकाला आपली ध्येये पडताळता येतात. आपल्या कामाची स्थितीही लक्षात घेता येते.

ई] लोकशाहीवादी प्रशासनामुळे परस्पर सुसंवाद साधला जातो, लोकशाहीवादी प्रशासनाच्या अभावामुळे वरील तत्वाला बाधा येते.

३. विकेंद्रीकरण पध्दती लोकशाहीला अनुकूल होती तर हुकूमशाही पध्दतीमुळे शिक्षकांमध्ये भीतीची जाणीव होत होती.

४. लोकशाहीमुळे उस्फूर्तपणे सहभाग व सृजनशीलतेला वाव होता.

५. यशदायी व फलद्रूप अशा लोकशाही सहभागाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रथम ती समजून घेऊन तिच्या प्रत्येक भागाची माहिती घेणे आवश्यक असते.

६. व्यवहारात हया तत्वज्ञानाची कल्पना पुढील टप्प्यावरून रुजली आहे किंवा नाही हे कळते.

अ] शालेय प्रशासनामध्ये शिक्षकांचा अधिकाधिक सहभाग असेल तर ते गृहणीय असते, ते प्रशासन लोकशाही पध्दतीचे असते.

आ] हेतुनिष्ठ कामाच्या वाटणीपेक्षा जबाबदाऱ्या सर्वांनी सहकार्याने वाटून घेतल्यास ते जास्त उपयुक्त असते.

इ] सहभाग हा मनाचा कल म्हणून अत्यावश्यक असावा, केवळ संघटनेची रचना म्हणून नको.

ई] समग्र विचाराच्या उपयोगामुळे चांगले निष्कर्ष मिळू लागतात.

उ] शालेय प्रशासनामध्ये कांही जबाबदारीची आणि अधिकाराची केंद्रे असणे आवश्यक आहे.

ऊ] जबाबदारी योग्य रितीने पार पाडावयाची असेल तर शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेणे आवश्यक आहे.

३] KAUR S.A. : A Critical Study of the Organisation and Finance in the State of Uttar Pradesh , Ph.D., Education, Avadh University, 1981......... 5

उत्तर प्रदेशातील शैक्षणिक संघटन, प्रशासन आणि आर्थिक घटकांचा चिकित्सक अभ्यास करणे. .. .. ..५

उद्दिष्टे -

१. प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक व प्रौढ तसेच तांत्रिक शिक्षणाच्या विकासाचा अभ्यास करणे व प्रशासनाचा अभ्यास करणे हे प्रमुख हेतू होते.

कार्यपद्धती -

१. प्रशासकीय घडीचा विकास आणि प्रसार आणि शैक्षणिक संस्थांच्या संख्येतील वाढ यांचे परिक्षणे करून तसेच झपाट्याने प्रसार होतानाच उच्च शिक्षणाच्याही दर्जाचा अभ्यास केला गेला.

२. विविध पातळ्यांवरिल शिक्षणाचा विकास व प्रसार तसेच प्रशासकीय घडीचा अभ्यास करण्यासाठी विविध समित्यांचे अहवाल, शासन आणि आयोगाचे दप्तर आणि वार्षिक अहवाल यांचा आधार घेतला गेला.

३. शिक्षणाच्या दर्जात्मक बाबींच्या विकासाचा अभ्यास करण्यासाठी ४८ प्राचार्य, १०८ विभाग प्रमुख, २६८ शिक्षक व ३६२ विद्यार्थ्यांना प्रश्नावल्या देवून माहिती गोळा केली.

निष्कर्ष -

१. विविध पातळ्यावरील व विविध प्रकारच्या संस्थांतून विद्यार्थी नोंदणीत भरपूर व वेगाने वाढ झाली.

२. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणावरील व्ययही तुलनात्मकदृष्टया चांगलाच वाढला.

३. सुयोग्य अध्यापनासाठी शिक्षकांच्या संख्येतही चांगलीच वाढ झाली, विद्यार्थी- शिक्षक गुणोत्तरात गेल्या अनेक वर्षात कोणतीही लक्षणीय तफावत आढळली नाही.

४. शिक्षण संचालनालयातील पर्यवेक्षण कर्मचाऱ्यांमध्येही लक्षणीय वाढ झाली.

५. स्वातंत्र्य मिळाल्यावर शैक्षणिक प्रशासनाशी संबंधित सदस्यांच्या बाबतीत स्वत: प्रमुख सचिव त्यांची कर्तव्ये बजावून काळजी घेत होते. शिक्षणासाठी स्वतंत्र संचालनालयाची स्थापना त्यांनी केली.

६. प्रौढ शिक्षणावरील कार्यक्रमाच्या व्ययात देखील विचारात घेण्याइतपत लक्षणीय वाढ झालेली आढळली.

७. दर्जात्मक बाबींचा विचार करता असे दिसून आले की, उच्च

पातळीवर मात्र इमारत, साधने, उपकरणे, प्रयोगशाळा, ग्रंथालये इ. आणि भौतिक सुविधांमध्ये मात्र सुधारणा होण्याची आवश्यकता आहे.

८. अभ्यासक्रमाचा आढावा घेण्याची गरज आहे.

९. बहुसंख्य शिक्षक, विभागप्रमुख आणि प्राचार्य यांनी सध्याच्या परिक्षा पध्दतीत पूर्णपणे पुनर्रचना करण्याची गरज प्रतिपादन केली.

१०. वार्षिक परीक्षांच्या ऐवजी नियमित काल कसोट्या असण्याची सूचना केली.

११. शिक्षकांनी त्यांच्या कामाच्या स्थितीत सुधारणा करण्याची आवश्यकता व्यक्त केली. त्यांचे कामही भरपूर असून त्याभानाने १९७३ साली मान्य केलेल्या यू.जी.सी. च्या वेतनश्रेणीचा वाढत्या महागाईमुळे पुन्हा एकदा आढावा घेण्याची गरज प्रतिपादन केली.

४] MAHANT G.V. : Stady of Adminsistrative bhaviour of High school Principals. in Central Gujrat, Ph.D., Edu., M.S.U., 1979 . 6

मध्यगुजरात मधील माध्यमिक शाळांच्या प्राचार्यांच्या प्रशासकीय वर्तनाचा अभ्यास करणे .. .. .. ६

उद्दिष्टे -

१. माध्यमिक शाळा मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन आणि दर्जा यांचे मुल्यमापन करणाऱ्या साधनांचा विकास करणे.

२. माध्यमिक शाळा प्राचार्यांच्या शैक्षणिक प्रशासकिय वर्तनाच्या परिणामाचे मुल्यमापन करणाऱ्या कृतींचा विकास करणे.

३. शिक्षकांचे काही व्यक्तीमत्व गुण, विद्यार्थ्यांचे आदर्श नियंत्रण, माध्यमिक शाळा प्राचार्यांच्या शैक्षणिक प्रशासनाचा परस्पर संबंधांचा अभ्यास करणे.

४. स्वत:च्या प्रशासकीय वर्तनाबाबत प्राचार्यांचे लक्षण आणि त्यांच्या शाळेतील शिक्षकांचे लक्षण यामधील परस्परसंबंध शोधणे.

५. माध्यमिक शाळा प्राचार्यांच्या शैक्षणिक वर्तनावर वय, लिंग, गुणवत्ता इत्यादि वैयक्तिक चलांच्या होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

कार्यपद्धती -

गुजरातच्या तीन प्रातिनिधिक जिल्ह्यांतून २७७ माध्यमिक शाळांमधून नमुना निवड केली गेली. ही निवड स्तरीत प्रमाणबद्ध नमुना आधार पध्दतीने केली गेली. प्रशासकीय वर्तनाच्या वर्णनाची प्रश्नावली संशोधकाने संशोधन साधन म्हणून विकसित केली. ओसी-डीक्यू ही हॅलपीनने विकसित केली आणि गांधींनी लागू केला. विद्यार्थ्यांचे आदर्श शिस्तमापन साधन विलओअर, आयडेल व हो यांनी विकसित केली आणि गांधींनी लागू केली. कॅटेलची सोळा पी. एफ. प्रश्नावली होती आणि स्टॉगडिल व शेर्टल यांनी त्याचा अभ्यास करून पृथ:करण केले. च्यायस्क्वेअर टेस्ट, टी टेस्ट, एफ टेस्ट व प्रॉडक्ट मोमेंट, सहसंबंधांचा सहगुणक यांचाही काही संख्याशास्त्राच्या तंत्राच्या माहितीच्या पृथ:करणासाठी उपयोग केला.

निष्कर्ष -

१. एकंदर शाळांपैकी ३५ % शाळा अधिकाधिक प्रशासकीय वर्तनाबाबत परिणामकारक आढळल्या तर एकंदर ३७ % शाळा ह्या कमी परिणामकारक पातळीच्या आढळल्या.

२. लिंग, वय आणि अनुभव यांचा कोणताही परिणाम प्रशासकीय वर्तनावर जाणवला नाही.

३. शाळेचा आकार, व्यवस्थापनाचा प्रकार, स्थान, अद्यावत दर्जा, यांचा मात्र प्रशासकीय वर्तनावर कोणताही परिणाम जाणवला नाही.

४. शिक्षक आणि प्राचार्यांचे लक्षण आणि प्रशासकीय वर्तन यामध्ये कोणत्याही प्रकारचा परस्परसहसंबंध आढळून आला नाही. शा

५. बंधनयुक्त वातावरणातील शाळांपेक्षा मुक्त वातावरणातील शाळांमधील शैक्षणिक प्रशासकीय वर्तन अधिकाधिक परिणामकारक आढळले.

६. कमी प्रतीच्या प्रशासनाच्या वर्तनापेक्षा ज्या प्राचार्यांचे वर्तन सहभागी प्रकारचे होते ते कमी दुराग्रही होते.

७. विद्यार्थी शिस्तीसंबंधी ज्या शाळांतील प्रशासन कार्यक्षम होते त्या शाळा व ज्या शाळांतील प्रशासन कार्यक्षम नव्हते त्या शाळांमध्ये दखल घेण्यासारखा फरक दिसून आला.

८. शिक्षकांच्याही व्यक्तीमत्वाचे लक्षण त्यांच्या प्राचार्यांच्या प्रशासकीय वर्तनाच्या परिणामकारकतेशी मोठ्या प्रमाणांत संबंधित असल्याचे आढळले.

५] MISRA , B.M. : Educational Administration in Orissa , D.Litt., Edu., Utkal Unixersity, 1984 7

ओरिसामधील शैक्षणिक प्रशासन ....७

उद्दिष्टे -

१. शिक्षणाची संरचना आणि कार्याचे परिक्षण करणे आणि त्याचे शिक्षणाच्या हेतूशी असलेले संबंध पाहणे.

२. शैक्षणिक पध्दती आणि शैक्षणिक प्रशासनाची परिक्षा करणे.

३. प्रशासनाबद्दल अपेक्षित असलेले हेतू वास्तवात किती प्रमाणात सफल झाले आहेत, त्यांचा शैक्षणिक भूमिकेशी संबंधीत पध्दतीची वैयक्तिक हाताळणी यांची परिक्षा करणे.

४. शैक्षणिक पध्दती, संरचना आणि राज्यातील अविकसित कायदे नियम, प्रशासकीय कार्याची भूमिका यातील परस्परसंबंध शोधून काढणे.

कार्यपध्दती -

हा अभ्यास म्हणजे विविध टप्प्यांच्या कार्याचे फलित होते. यासाठी दप्तराचे सर्वेक्षण, प्रश्नावलीद्वारे सर्वेक्षण, मुलाखती, व्यक्ती-अभ्यास आणि अभ्यासासाठी सहकारी निरीक्षण, विविध स्वरूप, प्रश्नावल्या, मुलाखती, निरीक्षण मार्गदर्शिका यांचा साधने म्हणून उपयोग केला. कार्यालयीन दप्तर, अधिनियम, नियम, यामधून माहिती मिळविली. १५ शैक्षणिक प्रशासक, १० निवडक प्रशासकांच्या मुलाखती, न्यायालयांच्या निर्णयांचा अभ्यास आणि शैक्षणिक बाबी-संबंधीच्या लवादाचा अभ्यास, २० संस्थांचा प्रत्यक्ष जाऊन केलेला अभ्यास आणि विविध घटनांचे वैयक्तिक निरीक्षण यांचाही माहिती मिळविण्यासाठी उपयोग केला. नंतर माहितीचे गुणवत्तेनुसार पृथ:करण केले.

निष्कर्ष -

१.] ओरिसामध्ये सुयोग्य व कार्यक्षम शैक्षणिक नोकरशाहीचा अभाव दिसून आला.

२. शैक्षणिक बाबींच्या प्रशासनामध्ये योजनांची रचना आणि कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी ओरिसा शासनाला शैक्षणिक बाबी-संबंधी सुयोग्य आणि पुरेशा संख्येने सल्लागारांचा अभाव दिसून आला.

३. ओरिसामध्ये कोणत्याही प्रकारची दीर्घमुदतीची शैक्षणिक योजना किंवा कृतीशील शैक्षणिक प्रशासकीय योजना दिसून आली नाही.

४. ओरिसामध्ये निरोगी शैक्षणिक नियोजनाचा अभाव दिसून येतो.

५. शिक्षणावरील खर्च विस्तृत प्रमाणात वाढविलेला असूनही दरडोई खर्चाचा विचार करता हे प्रमाण कमीच होते.

६. यामुळे वेतनश्रेणी, शिक्षणाची समग्र रचना, दर्जेदार इमारती, शैक्षणिक साधने आणि उपकरणे इत्यादिवर प्रतिकूल परिणाम झालेला दिसून आला.

७. शैक्षणिक विस्तार हा प्रामुख्याने राजकीय हेतूनेच केलेला दिसून आला.

८. शिक्षणासाठी आर्थिक तरतुदीमध्ये वाढ करण्यासाठी कांहीवेळा मोठे पाऊल टाकूनसुध्दा लोकांमध्ये शिक्षणाबद्दल जागृती होऊ शकली नाही आणि गळतीचे प्रमाणही कमी झाले नाही.

९. परिणामकारक आणि आकर्षक व्यावसायिक शिक्षणाच्या अभावा-मुळे उच्च शिक्षण घेण्याकडेच विद्यार्थ्यांचा ओघ वाढलेला दिसून आला.

१०. राजकीय विचारातून मोठ्या संख्येने महाविद्यालये उघडण्यांत आली शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्याही राजकीय विचा-रातून करण्यांत आल्या आणि अध्यापन, परीक्षा, नवीन अभ्यास-क्रमाची ओळख, विषय आणि जागा यांच्याकडेही राजकीय दृष्टीको-नातूनच पाहिले जात होते.

११. कुचकामी उच्चशिक्षणाचा विस्तार झाला. शिक्षणाच्या प्रत्येक पातळीवर राजकारण होते. माध्यमिक स्तरावर दिशा देणाऱ्या आणि व्यावसायिक मार्गांचा अभाव होता. सदोष इमारती, उपकरणे आणि फर्निचर, सदोष व खालच्या दर्जाची पुस्तके, नैतिक-दृष्ट्या भ्रष्ट शिक्षक आणि नोकरशाहीतील भ्रष्टाचारात उच्चपदस्थां-पर्यंत हात पसरलेले होते.

१२. शिक्षणाशी संबंधित उच्चस्तरावरील नोकरशाहीला शैक्षणिक प्रशासनासंबंधित योजनांची रचना आणि शैक्षणिक प्रशासनाच्या संबंधित कृती करण्यात अपयश आले कारण कमी कुवतीच्या व अनुभव नसलेल्या प्रशासकांच्या हातात अधिकार होते.

१३. ज्या प्रशासकांची नियुक्ती केली होती त्यांना किमान शैक्षणिक पात्रताही नव्हती.

१४. हे प्रशासक त्या पदासाठी अप्रशिक्षित होते.

१५. त्या प्रशासकांची निवडही हेतूनिष्ठ दृष्टीकोनातून केली गेली होती.

१६. शैक्षणिक प्रशासन आणि सर्वसामान्य प्रशासन या दोहोंना एकाच मापदंडात मोजले गेले.

१७. जे काही मोजके पात्र प्रशासक होते त्यांना आवश्यक ते अधि-कार नसल्याने ते कोणताही प्रभाव दाखवू शकले नाहीत.

१८. भ्रष्ट मार्गाने पदोन्नती दिल्याने प्रशासकांमध्ये नैतिकता राहिली नाही.

१९. राज्यभर शिक्षणाच्या सुस्थिरतेबाबत कोणतीही ठाम एकी नव्हती.

६] MISRA, RAMKISHORE : A Critical Study of Administration of secondary education in rural areas of Faizabad division, Ph.D., Edu., Avadh Uni., 1983.[8]

फैजाबाद विभागातील ग्रामीण भागातील माध्यमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

उद्दिष्टे -

१. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या फैजाबाद विभागातील माध्यमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास करणे.

२. या विभागातील शिक्षणाच्या सर्वसाधारण पार्श्वभूमिचा अभ्यास करणे.

३. शासनाची भूमिका, तिचे नियंत्रण, आणि पर्यवेक्षण माध्यमे, या विभागातील ग्रामीण माध्यमिक शिक्षणासंबंधीत व्यवस्थापनाचे प्रशासन याचे संशोधन करणे.

४. शिक्षक व मुख्याध्यापक संबंधित प्रशासकीय भूमिका, सेवाशर्ती इत्यादिचा अभ्यास करणे.

कार्यपद्धती -

हे संशोधन सर्वेक्षण पध्दतीने अभ्यासले गेले असता अभ्याससाठी नमुना म्हणून ७ जिल्ह्यांचे शाळा निरीक्षक [ यामध्ये एका मुलींच्या शाळेच्या ग्रामीण निरीक्षिकेचाही समावेश होता ] २५८ प्राचार्य, २२० शिक्षक, २२२ विद्यार्थी - जे ग्रामीण माध्यमिक शाळेतील होते. संशोधकाने ४ प्रश्नावल्या तयार केल्या. मुलाखती व

निरीक्षण हे नियोजनपूर्वक केले व त्यावरून माहिती गोळा केली. संपादित माहितीवरून सारणीकरण व पृथ:करण करून त्याचा उपयोग करून शेकडेवारी काढली.

निष्कर्ष -

१. प्रतापगड, वगोंडा हे जिल्हे उत्कृष्ट आढळले तर फैजाबाद विभागातील ग्रामीण माध्यमिक शिक्षणासाठीच्या शैक्षणिक सुविधा अधिक निकृष्ट होत्या. पूर्ण शैक्षणिक संस्थांचा विचार करता फक्त २ % संस्था मुलींच्या होत्या. तर ९७ % संस्था मुले-मुली दोहोंसाठी होत्या. ४० % पेक्षा जास्त संस्था ह्या रस्त्याच्या जवळ नव्हत्या आणि १५ % पेक्षा जास्त शाळांच्या एक किलोमीटर परिसरात डाक कार्यालय नव्हते.

२. ३/४ पेक्षा जास्त प्राचार्य हे शैक्षणिक प्रशासन शासन अनुकूल असावे या बाजूचे होते. उत्तरप्रदेश माध्यमिक शिक्षण मंडळाचा यावर मोठा प्रभाव आढळून आला. शिक्षणखात्याच्या विविध अधिका-यांची भूमिका ही असमाधानकारक आढळून आली.

३. १/४ संस्थामधील व्यवस्थापनाची भूमिका असमाधानकारक होती. व्यवस्थापनाचे राजकीय लागेबांधे मोठ्या प्रमाणांत असल्याने त्याचा संस्थेच्या कार्यावर प्रतिकूल परिणाम होत होता.

४. प्राचार्यांचे अधिकारही अपुरे आढळले. त्यांना शासन आणि व्यवस्थापन दोहोंना तोंड द्यावे लागत होते. शासन आणि व्यवस्थापन यांच्यामुळे प्राचार्यांच्या कार्यावर प्रतिकूल परिणाम होत होता. घालून दिलेल्या निकषानुसार आवश्यक असणा-या शिक्षकांची संख्याही कमी आढळली. विज्ञान, गणित, इंग्रजी व वाणिज्य विषयाचे चांगले शिक्षक उपलब्ध नव्हते. आपली शैक्षणिक गुणवत्ता

वाढविण्यासाठी शिक्षकांना कांही संधी उपलब्ध होत्या. इतर व्यवसायांशी तुलना करता शिक्षकांच्या सेवाशर्ती चांगल्या असूनही ते असमाधानी होते.

५. निम्म्यापेक्षा जास्त शाळांत कार्यालयीन सहाय्यक समाधान-कारक संख्येने होते. ३ / ४ शिक्षकांची अशी भावना होती की, त्यांच्या प्राचार्यांचे कारकुनांवर नियंत्रण नव्हते. कांहीवेळा व्यव-स्थापनाच्या हस्तक्षेपामुळे परिस्थितीवर प्रतिकूल परिणाम होत होता.

६. ३ / ४ पेक्षाही जास्त संस्थामध्ये पुरेशा वर्ग खोल्या नव्हत्या, निम्म्या संस्थांत प्रयोगशाळांची स्थिती, साधने इत्यादि किमान गरजेइतक्याही नव्हत्या . ग्रंथालये शासनाच्या किमान सुविधाचे नियमही पूर्ण करु शकत नव्हते आणि ९३ % पेक्षाही जास्त संस्थांमध्ये अभ्यासाची खोली [ रिडींगरुम ] नव्हती.

७. उत्तरप्रदेश माध्यमिक शिक्षण मंडळानुसारच अभ्यासक्रमांची रचना केली होती. स्थानिक गरजा व स्थितींकडे प्रामुख्याने कानाडोळा केलेला दिसून आला.

८. १/३ संस्थांमध्येच केवळ समाधानकारक क्रिडा साहित्य होते. घालून दिलेल्या निकषानुसारही निधींचा विनियोग केला जात नव्हता.

९. परीक्षांमध्ये "कॉपी" ही मोठ्या प्रकारची समस्या होती. गांभीर्याने परीक्षा घेतल्या जात नव्हत्या.

१०. ९२ % पेक्षा जास्त संस्थांमधील आर्थिक स्थिती असमाधानकारक होती. त्याठिकाणी आर्थिक नियोजनाचाही अभाव होता. त्या-हूनही विनाअनुदानित शाळांची आर्थिक स्थिती तर अधिक हलाखीची होती. कांहीवेळा प्राचार्य आणि व्यवस्थापन यांतील ताणलेल्या संबंधामुळे आर्थिक व त्यांच्या इतर स्थितींवर प्रतिकूल परिणाम होत होता.

७] NAMBIAR, A.K.N.: Administration of School education in the State of Kerla, Ph, D., Education, Kerla Uni., 1976. 9

केरळ राज्यातील माध्यमिक शाळांचे शैक्षणिक प्रशासन ... ... १

उद्दिष्टे –

नवीन केरळ राज्यात पहिल्या २० वर्षांत केरळ शिक्षण कायदा आणि नियम आणि कायद्याची शालेय प्रशासनातील अंमलबजावणी व महत्त्व किती प्रमाणात होते ते पाहणे.

कार्यपध्दती –

हा अभ्यास मुख्यत्वे कार्यालयीन कागदपत्रांना वगळूनच केला गेला. त्यास पूरक म्हणून कागदपत्रांची चिकित्सा केली व प्रश्नावल्या, सर्वेक्षण आणि व्यक्ती अभ्यास यांचा संशोधनाचे साधन म्हणून उपयोग केला.

निष्कर्ष –

१. केरळ शिक्षण कायदा आणि नियम, त्यातील तरतुदी ह्या त्या ठिकाणच्या खाजगी शाळा योग्य रितीने चालविण्यासाठी पुरेशा आहेत.

२. कायद्याच्या विभाग ४ अनुसार शासनाला अनुदानित शाळांमध्ये शिक्षकांची नेमणूक करण्याचा अधिकार मिळाला. संस्थाचालकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे मतप्रदर्शन करण्याचे स्वातंत्र्य आहे.

३. अनुदानित शाळांना मान्यता देण्यासंबंधी पूर्तता करावयाच्या अटींबाबत केरळ शैक्षणिक कायद्यात कसलाही उल्लेख केलेला नाही.

४. खाजगी शाळांतील शिक्षकांच्या उच्चापुर्तींच्या सुरक्षिततेची यादी होती.

५. बाह्य परीक्षांचे निकाल विचारात घेता अनुदेशनाचा दर्जा कमी आढळला आणि शिक्षणावर होणारा व्ययही राष्ट्रीय उत्पान्नाच्या मानाने प्रचंड आहे.

६. शिक्षकांच्या संघटना राजकीय धाग्याने बांधल्या गेल्या असून त्यामुळे त्यांच्या सैदस्यातही बेशिस्त आहे.

८] PANDA, S.N. : Administration Behaviour of Headmasters Some Correlates & back ground factors, Ph.D., Rajasthan University, 1975. 10

मुख्याध्यापक, त्यांच्याशी संबंधित आणि त्या पार्श्वभूमीवरील विविध घटकांचे प्रशासकीय वर्तन पाहणे. १०

उद्दिष्टे -

१. व्यवहारामध्ये मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन आदर्श प्रशासकीय वर्तनानुसार आहे काय याचा शोध घेणे.

२. संस्था व शाळेच्या दर्जा व परिणामकारकता यासंबंधी आदर्श व वास्तव प्रशासकीय वर्तन यामधील संबंधाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३. प्रशासकीय वर्तनामागील कार्यरत घटक कोणते आहेत याचा शोध घेणे.

## कार्यपद्धती -

एकंदर १६८ शाळांमधील २००० शिक्षकांचा अभ्यास केला. यासाठी राजस्थानातील निवडक शाळा घेतल्या. यासाठी स्तरीत नमुना निवड तंत्राचा आधार घेतला गेला. तसेच माध्यमिक विरुद्ध माध्यमिक, ग्रामीण विरुद्ध शहरी, मुले विरुद्ध मुली असा पाया गृहीत धरला गेला, मुख्याध्यापकांच्या आदर्श व वास्तव वर्तनाबाबतची माहिती आणि त्यामागील कार्यरत घटक, ही मुख्याध्यापकांना आदर्श व वास्तव अशा स्वतंत्र प्रकारच्या विस्तृत माहितीची प्रश्नावली देऊन मिळविलेल्या माहितीचे पृथ:करण "चाय स्क्वेअर " चाचणीने केले.

## निष्कर्ष -

१. प्रशासकीय वर्तनाबाबत मुख्याध्यापक वास्तोतवास्त आत्मकेंद्री, अधिकारवादी, स्टोवादी. आणि दळणवळणाबाबत कमी परिणामकारक, कमी सहकार्यशील, दुस-यांबद्दल कमी सहानुभूती असणारे असे आढळले.

२. आदर्श प्रशासकीय वर्तनामध्ये मात्र दुस-यांचा विचार घेणे, उत्पादक मूल्याधिष्ठता, सहकार्य भावना, रचनात्मक आणि समायोजकता, उच्चशिक्षित प्रधान, अशा बाबी होत्या.

३. कार्यक्षम शाळांचे मुख्याध्यापक इतरांचा अधिकाधिक सहयोग घेणारे, कमी अधिकार गाजवणारे, आणि सकारात्मक असे होते.

४. शहरी भागातील शाळांमध्ये असलेले मुख्याध्यापक अधिकाधिक जुळवून घेणारे, परिणामाचा विचार न करणारे, अधिक परिणामकारक संपर्क ठेवणारे, आणि सकारात्मक आढळले.

५. तुलनात्मकदृष्टया मुलींच्या शाळांच्या मुख्याध्यापकांपेक्षा - मुलांच्या शाळांचे मुख्याध्यापक मात्र कमी अधिकार गाजविणारे, कमी संपर्कशील, परिणामाचा विचार कमी करणारे आढळले.

६. मुख्याध्यापकांच्या प्रशासकीय वर्तनामागचे कार्यरत घटक पुढील प्रमाणे आढळून आले.

१] कार्य करणाऱ्या शिक्षकांमधील फरक.

२] शिक्षकांचे गट

३] आसपासच्या वातावरणाच्या साक्षरतेच्या पातळी- नुसार विद्यार्थ्यांच्या साक्षरतेच्या पातळीमधील फरक.

४] अधिकाऱ्यांचा प्रशासनामधील हस्तक्षेप

५] स्वतःचे कमी प्रतीचे समजणे [ अपराधी गंड ]

९] SHARMA, B.D. : A New Concept of Educational Administration in India, Ph.D., Education, Vikram University, 1964 .[11]

भारतीय शैक्षणिक प्रशासनातील नवी संकल्पना.

उद्दिष्टे -

मध्यप्रदेशातील शैक्षणिक प्रशासनासंबंधी सद्यस्थितीचा अभ्यास व पृथ:करण हे ध्येय डोळ्यासमोर ठेवणे आणि त्यात सुधारणा होण्या- साठी कांही पर्यवेक्षण संबंधी नवीन संकल्पना सुचविणे.

कार्यपद्धती -

सन १९३६ सालच्या या अभ्यासासाठी शिक्षण संचलनालय, जिल्हा शिक्षणाधिकारी, शाळा निरीक्षक, संस्थाप्रमुख, व्याख्याते, आणि शिक्षक यांचा नमुना म्हणून सहभाग घेतला.

संशोधनाचे साधन म्हणून त्यासाठी मुख्यतः होय / नाही आणि बहुपर्यायी निवड प्रश्नावलीची रचना केली गेली.

आकारमानाच्या दृष्टीने जिल्ह्याची रचना समान नसल्याने विभागीय अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रानुसार विचार केला.

<u>निष्कर्ष</u> –

१. विभाग आणि त्याचे सचिव यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव होता.

२. राज्य, विभाग आणि जिल्हापातळीवरील अधिकाराचे केंद्रीकरण स्पष्टपणे होते.

३. अध्यापनाचे पर्यवेक्षण अकार्यक्षम होते, त्यातच विविध अभ्यासक्रम चालू ठेवल्याने पर्यवेक्षणाची स्थिती अधिकच बिकट झाली होती.

४. पर्यवेक्षणाची संरचना आणि पर्यवेक्षण अहवाल त्या त्या प्रदेशाप्रमाणे वेगवेगळे होते.

५. शिक्षकांची निवड गुणवत्तेनुसार व कार्यक्षमतेनुसार केली जात होती.

६. कोणत्याही त्वरीत निर्णयासाठी सत्तेचे केंद्रीकरण हे अडथळा ठरत होते.

७. सर्वच पातळ्यावरचे प्रशासन त्यांच्या वेतनश्रेणीबद्दल असमाधानी होते.

८. सर्वसाधारणपणे मुख्याध्यापक ~~अध्ययन~~ अध्यापन करत नव्हते.

९. शिक्षकांना त्यांची गुणवत्ता अधिकाधिक सुधारण्याकरिता त्यांना वेतनश्रेणीच्या पुनर्रचनेचे प्रोत्साहन दिले गेले पाहिजे.

१०. प्रशासकांच्या प्रशिक्षणाबद्दल मात्र कोणीही विचार केलेला आढळला नाही.

११. प्रशिक्षण महाविद्यालये आणि शाळांमध्ये कोणत्याही प्रकारचा समन्वय आढळला नाही.

१२. प्रशिक्षण महाविद्यालयामध्ये शिकविल्या गेलेल्या कोणत्याही पद्धती अध्यापक वापरत नसल्याचे दिसते.

१०] VARTAK, R.M. : A Critical Study of Educational Organisation, Administration and Problem, Under the Maharashtra Z.P. and Panchyat Samities Act of 1961, in the State of Maharashtra, Ph.D., Education, S.N.D.T. University, 1971.[12]

शैक्षणिक संघटन, प्रशासन आणि समस्यांच्या महाराष्ट्र जिल्हा परिषदा, आणि पंचायत समित्या सन १९६१ च्या कायद्यानुसार महाराष्ट्र राज्यांतर्गत चिकित्सक अभ्यास.

उद्दिष्टे -

१. स्थानिक अधिकाऱ्यांच्या शैक्षणिक प्रशासनाचे मूल्यमापन करणे.

२. बळवंतराय कमिटीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र राज्यात शैक्षणिक प्रशासनात लोकशाही तत्त्वानुसार विकेंद्रीकरण झाले आहे काय आणि त्याचा ग्रामीण शैक्षणिक विकासासाठी महाराष्ट्रात उपयोग झाला आहे काय? याचा आढावा घेणे.

३. त्याचे कच्चे दुवे शोधणे व त्यानुसार त्यावर उपाय सुचविणे.

कार्यपद्धती -

एकंदर २६ जिल्ह्यांपैकी २३ जिल्ह्यांमधून माहिती गोळा केली. माहिती विविध अधिकाऱ्यांकडून गोळा करावी लागली, उदा. शासकीय शैक्षणिक अधिकारी, लोकप्रतिनिधी, शिक्षक ..

या संशोधनासाठी पुढील संशोधनाची साधने वापरण्यांत आली. प्रश्नावली, मुलाखती, निरीक्षण, जिल्हा परिषदेच्या शिक्षण विषयक सभांना हजर राहणे, तसेच संबंधित कागदपत्रांचाही आधार माहिती गोळा करण्यासाठी घेतला गेला.

<u>निष्कर्ष</u> –

१. शैक्षणिक प्रशासनाच्या विकेंद्रीकरणामुळे ग्रामीण भागातूनही शिक्षणाचा प्रसार झाला आणि शिक्षणाचा विकासही सुरु झाला. थोडक्यात या प्रकारचे प्रशासन पूर्ण राज्याला अधिक फायदेशीरच ठरले.

२. सर्वसामान्य माणसाचे त्यामुळे शिक्षणाकडे औत्सुक्य, आवड वाढली आणि हेच नेमके याचे फलित आहे.

३. जिल्हा परिषदेच्या शिक्षण समितीवर निवडलेल्या व्यक्ती मात्र पूर्ण जिल्ह्याच्या शैक्षणिक जबाबदारीसाठी अकार्यक्षम होत्या.

४. उद्दिष्टांच्या फलितांचा विचार करता असे दिसले की, विकेंद्रित प्रशासनामुळे स्थानिक स्वराज्य संस्थाचे अधिकारी शिक्षणाचा प्रसार करण्यात यशस्वी ठरले. ग्रामीण भागातील स्थानिक सहभागामुळे व शैक्षणिक समस्या ह्या मर्यादित असल्याने त्या ग्रामीण सहभागामुळे सोडवू शकले.

५. स्थानिक तरुण नेतृत्व ग्रामीण भागातील शिक्षणाच्या बाबतीत अधिक उपयोगी दिसून आले.

६. प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाबाबत मात्र तालुका गट पातळीवर प्रशासकीय कृतीशील कार्य कांही मर्यादेपर्यंत टाळलेले दिसून आले.

७. ग्रामिण भागातील प्रतिनिधींचा कल मात्र अधिकाधिक सहकार्यशील आणि शैक्षणिक प्रशासनात अधिकाधिक भाग देत होता असे जाणवले.

८. ब्रिटीशी आमदानीत जो कल नोकरशाहीचा आढळून येत होता, तोच कल अद्यापही शैक्षणिक प्रशासनाच्या नोकरशाहीतही आढळून आला.

९. महाराष्ट्रात कोणत्याही जिल्हयाला दीर्घ मुदतीचे शैक्षणिक नियोजन हाती घेतले नसल्याने, स्थानिक लोकांच्या गरजा, आकांक्षा, इच्छा या शिक्षणाच्या नियोजन कार्यक्रमात दिसून आल्या नाहीत.

१०. लोकांमधून निवडलेल्या प्रतिनिधीच्या शैक्षणिक प्रशासनातील सहभागामुळे प्रशासनात विकास दिसला आणि शैक्षणिक प्रशासनातील साचेबंदपणा कमी आला.

११. सद्यस्थितीच्या शैक्षणिक प्रशासनाच्या रचनेच्या काही मर्यादांमुळे असे आढळले की, खरेखुरे प्रशासन लोकांच्या आकांक्षा, इच्छाप्रमाणे त्यांच्यापर्यंत पोहोचू शकले नाही.

१२. शिक्षणाधिकाऱ्यांवरील वाढत्या जबाबदारीमुळे असे आढळले की, त्यांच्या प्रशासकीय कामाव्यतिरिक्त शैक्षणिक सेवेमध्ये पर्यवेक्षण, मार्गदर्शन, भेटी, इ. तसेच शैक्षणिक आढावा, संशोधन यामध्ये भाग घेणे शक्यच नसते.

१३. कलम ९५ व १०० महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या कायदा सन १९६१ नुसार शिक्षणाधिकाऱ्यांच्या कर्तव्याबाबत काहीतरी स्पष्ट निर्देश असणे आवश्यक आहे, ज्यामुळे शिक्षणाच्या विकासासाठी शैक्षणिक प्रशासनाला गती देता येईल.

१४. शिक्षणाचा सर्व बाजूंनी विकास होण्यासाठी विस्तार अधिकाऱ्यांवर त्याचे ओझे आणूनही चालणार नाही.

१५. विविध विभाग आणि जिल्हे यांच्यात परस्पर आणि निकोप

स्पर्धा होणे आवश्यक आहे, म्हणून शिक्षणाचा विकास आणि शिक्षणाच्या सुविधांचा विकास होण्यासाठी प्रस्तुत संशोधकांनी काही शिफारशी केलेल्या आहेत.

## २.३ समारोप -

या प्रकरणात संबंधित साहित्याचा व संबंधित संशोधनाचा अभ्यास केला. या पुढील प्रकरणात माध्यमिक शाळेचे प्रशासन या संबंधी तात्त्वीक माहिती घेतली आहे. ही माहिती संबंधित संशोधनासाठी पार्श्वभूमी म्हणून आवश्यक होती.

*--*--*

## –=: संदर्भ :=–


[१] डॉ. भा. गो. बापट : शैक्षणिक संशोधन, पुणे, नूतन प्रकाशन, १९७५, पृष्ठ क्र. ६४

[२] श. श. मुळे व वि. तु. उमाटे : शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूर, साहित्य प्रसार केंद्र प्रकाशन, १९७७, पृष्ठ क्र. ७०

[3] DAS M. : Cited by M.B. BUCH (Education) "Fourth Survey of Research in Education, " (Volume II ) New Delhi, N.C.E.R.T., 1983-88 Page No. 1078

(4) EXEKEIL N. : Cited by M.B. BUCH (Education ) "A Survey of Research in Education, " Baroda, Center of Advanced Studies in Education, 1974, Page No. 494

(5) KAUR S. A. : Cited by M.B. BUCH (Education ) "Third Survey of Research in Education, " New Delhi, N.C.E.R.C. 1978-83 Page No. 902

(6) MAHANT G. V. : Ibid Page No. 909

(7) MISRA B.M. : "Fourth Survey of Research in Education, " ( Volume II) Op. Cit. Page No. 1094

(8) MISRA RAMKISHORE, : Ibid Page No. 1095



12976

A

(9) NAMBIAR A.K.N. : "Third Survey of Research in Education."
Op. Cit.
Page No. 918

(10) PANDA S. N. : Cited by M.B. BUCH (Education "Second Survey of Research in Education."
Baroda, Centre of Advanced Studies in Education, 1979
Page No. 484

(11) SHARMA B.D. : "A Survey of Reserch in Education."
Op. Cit.
Page No. 505

(12) VARTAK R. M. : Ibid,
Page No. 511

* * *